
ISSN-2320-4439
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

VOLUME : III ISSUE II July - Sep. 2019



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Sci. Aurangabad

ART'S I COMMERCE I SCIENCE I SOCIAL SCIENCE I
EDUCATION I MANAGEMENT I MEDICAL I ENGINEERING & IT I
LAW I PHARMACY I PHYSICAL EDUCATION I AGRICULTURE I
JOURNALISM I MUSIC I LIBRARY SCIENCE I

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate
E-mail : powerofknowledge3@gmail.com
www.powerofknowledge.co.in

# अनुक्रमणिका (Index)


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Study of radiological parameters of smart materials using gamma ray spectrometry | Sandip S. Pawar, Vishal V. Awasarmol Siddheshwar D. Raut, Pravina P. Pawar | 1 |
| 2 | The Forgotten "First Nightangle" in My Garden ! | Dr.Khan A. S. | 6 |
| 3 | Effects Of Learning Disability On Academic Achievement Among school going Students. By | Dr.Bharat H Mimrot, | 11 |
| 4 | Spiritual Intelligence and Academic achievement of adolescence | Dr.S.M.Watore | 22 |
| 5 | RELIGION WISE POPULATION IN JALNA DISTRICT: A GEOGRAPHICAL ANALYSIS | Pramod B. Deshmukh, | 28 |
| 6 | A view of Thomas Kuhn and Growing Paradigm of Geography | Dr. Sonavane Sudarshan Venkatrao | 32 |
| 7 | Transformation of Raju from a Tourist Guide to a Spiritual Guide with Reference | Mrs. Sujata Gomteshwar Patil | 41 |
| 8 | Emerging Trends in Media Management: An Efficient and Effective way to the development of Marketing in Marathwada Region. | Dr.Waghmare M.S. | 47 |
| 9 | Resource sharing in electronic Era | Mrs.Dhanawanti Sunil Bamane. | 56 |
| 10 | Green revolution and its impact on solapur district (mh): geographical approch | Dr. S.M.Mulani | 62 |
| 11 | SIGNIFICANCE OF SPORE IN CLOUD PRODUCTION OVER THE FIELD OF TOMATO CROP IN RABBI SESASON FROM HER TQ UDGIR. DIST LATUR (M S) | Dr. Chate D.B. | 67 |
| 12 | भारतातील उदारीकरण आणि अर्थव्यवस्थेवरील परिणाम | प्रा.डॉ.पांडुरंग सदाशिव डांगे | 71 |
| 13 | छत्रपती शाहु महाराजांचे अर्थकारण आणि सामाजीकीकरण - एक विश्लेषणात्मक अध्ययन | डॉ.अशोक कोरडे | 77 |
| 14 | बहिणाबाईंच्या कवितेतील जीवनविषयक तत्वज्ञान | प्रा.रेखा व्ही.इंगोले | 85 |
| 15 | समकालीन सामाजिक स्थित्यंतरे आणि मराठी साहित्य | डॉ.पंढरी डोईफोडे | 89 |
| 16 | मुस्लिम मराठी कथेतून चित्रित झालेला समाज | नाईनवाड रमेश नागोराव | 95 |
| 17 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्र विषयक भूमीका | सुरवसे तुकाराम नागनाथ | 99 |
| 18 | मराठवाडयातील कांदकरी | प्रा.डॉ.प्रधान रामकृष्ण ज्योतिबा | 103 |
| 19 | सानिया यांच्या कादबऱ्यातील स्त्री व्यक्तीरेखा | प्रा.डॉ. सविता मा. पवार | 108 |
| 20 | श्रीमद्भगवद्गीतेच्या ध्यानयोगाचा कालसंवादी अर्थ | डॉ.पंकजा माधव वाघमारे | 112 |
| 21 | भटक्या विमुक्त जमातीचे प्रनेते : अण्णा भाऊ साठे | भास्कर बंडू ससाने | 115 |


Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# श्रीमद्‌भगवद्‌गीतेच्या ध्यानयोगाचा कालसंवादी अर्थ

**डॉ.पंकजा माधव वाघमारे**

सहयोगी प्राध्यापक, संस्कृत विभाग,

शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.

'श्रीमद्‌भगवद्‌गीता' असा एकमेव ग्रंथ आहे ज्याचे संपूर्ण जगाला आकर्षण आहे. श्रीमद्‌भगवद्‌गीता हा केवळ सातशे श्लोकांचा लहानसा ग्रंथा असला तरी अर्थ-गांभीर्यांच्या दृष्टीने त्याची योग्यता फारच मोठी आहे. श्रीमद्‌भगवद्‌गीता ही एक जीवन - प्रणाली आहे. गीतील उपदेशाचा अंगिकार केल्यास मनुष्याचा अभ्युदय निश्चितपणे होतो. श्रीमद्‌भगवद्‌गीतेच्या प्रत्येकच अध्यायातील विवेचन हे आजच्या काळात देखील अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. विशेषत: सहाव्या अध्यायाचा, ध्यानयोगाचा विचार केला तर त्याचा कालसंवाही अर्थ हा श्रेयस्कर आहेत पण मनुष्याला उन्नतीप्रत नेणाराही आहे.

श्रीमद्‌भगवद्‌गीता ग्रंथाचा महिमा अपार व अपरिमित आहे. हा एक परम रहस्यमय ग्रंथ आहे. रचना सरळ व सुंदर असली तरी आशय मात्र गूढ व गंभीर आहे. लोकमान्य टिळकांनी पंचेचाळीस वर्ष गीतेचे मनन केले व मग गीतारहस्य हा अद्‌भुत ग्रंथ लिहिला. महात्मा गांधींनी चाळीस वर्ष मनन केले व मग आपले भाषांतर प्रकाशित केले. [१]

गीता ही सर्वशास्त्रमयी आहे. गीतेमध्ये सर्व शास्त्रांचे सार सामावलेले आहे. गीतेचे व्यवस्थित ज्ञान झाल्यावर सर्व शास्त्रांचे तात्विक ज्ञान आपोआपच होते त्यासाठी वेगळ्या परिश्रमांची गरजच पडत नाही. महाभारताने देखील सर्वशास्त्रमयी गीता[२] असे म्हटलेले आहे. गीतेचे व्यवस्थितपणे श्रवण, कीर्तन, पठन-पाठन, मनन व धारण केले पाहिजे. असे केल्यास इतर शास्त्र-संग्रहाची गरजच काय ? असे देखील वेदण्यासांनी महाभारतात प्रतिपादन केले आहे.

गीता सुगीता कर्तव्या किमन्यै: शास्त्रसंग्रहै: ।[३] गीतेतील प्रत्येक शब्द हा यथार्थ आहे. भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला केलेला हा उपदेश म्हणजे अनुपम असे एक शास्त्रच आहे. श्रीकृष्णार्जुनाच्या रंजक संवादामुळे त्याचे वाङ्‌मयीन मूल्य हे अपरिमितच आहे. श्रीमद्‌भगवद्‌गीतेत जे सिध्दांत प्रतिपादित केले आहेत ते शाश्वत आहेत, चिरंतन आहेत आजच्या काळातही अत्यंत उपयुक्त आहेत.

पाचव्या अध्यायाच्या प्रारंभी अर्जुनाने 'सांढ्ययोग' व 'कर्मयोग' या दोन्हींपैकी कोणते एक साधन निश्चितपणे कल्याणप्रद आहे विचारल्यानंतर भगवान श्रीकृष्णांनी ध्यानयोगाचे सांगोपांग व विस्तृत वर्णन केले आहे. सहाव्या अध्यायात, ध्यानयोगात शरीर, इंद्रिये, मन आणि बुध्दी यांचा संयम करण्याची गरज असते या गरजेचे वर्णन केले आहे. शरीर, इंद्रिये, मन व बुध्दी या सर्वांना आत्मा या नावाने ओळखले जाते आणि या अध्यायामध्ये यांच्यात संयमाचे विशेष वर्णन केले आहे. म्हणून या अध्यायाचे नांव 'आत्मसंयमयोग' असे ठेवले आहे.[४]

श्रीमद्‌भगवद्‌गीतेंच्या वर्थ विषयाचा विचार केल्यास लक्षात येईल की, मनुष्याला व्यवहार शिकवण किंवा जीवनाची कला शिकवण हा याचा मुख्य विषयच नाही तरी देखील जिथे कुठे सहज शक्य आहे तिथे मनुष्याला अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक असे विवेचन भगवान श्रीकृष्णांनी केले



Govt. College of Arts & Science Aurangabad.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

आहे. ते इतके चिरंतन आहे की, आजच्या काळाशीसुध्दा या ज्ञानाची सांगड घालता येते. मनुष्यजीवनाला श्रेयस्कर मार्ग सांगणारे सहाव्या अध्यायातील काही कालसंवादी विचार -

लंबन :- उद्धरेदात्मनाऽऽत्मानं नात्मानवसादयेत्।

आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मन:।।[5]

स्वत: मनुष्याने आत्म्याच्याद्वारे आत्म्याचा उद्धार करावा, आपल्या आत्म्याची कधीही अद्योगती करु नये कारण आत्माच आत्म्याचा बंधु आणि आत्माचा आत्म्याचा शत्रु आहे.

या श्लोकात मानवी उन्नतीचा मंत्र हा स्पष्ट शब्दात सांगितला आहे. आपण स्वत:च आपल्या उद्धारासाठी कंबर कसली पाहिजे आणि त्याची अधोगती होण्याजोगे कर्म कधीही करता कामा नये. व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्या उध्दारासाठी हाच नियम आहे. स्वावलंबनाचा हा परिपाठ आजही प्रत्येक मनुष्याला लागू पडतो.

**समत्वभाव :-**

भारतीय लोकशाहीमध्ये देखील समतेला किंवा समत्वभावाला अनन्यसाधारण महत्त्व दिलेले आहे. ध्यानयोगातील समभावाचे विवेचन हे विचारात घेण्याजोगे आहे.

सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबन्धुषु।[6]

साधुष्वपि च पापेषु समबुध्दिर्विशिष्यते।।

सुहृद्, मित्र, शत्रु, उदासीन, मध्यस्थ, द्वेषी आणि बंधु तसेच साधु आणि पापी यांना जो समान दृष्टीने पाहतो तो श्रेष्ठ होय. ज्याच्या ठिकाणी नि:पक्षपाती समदृष्टी आहे तो श्रेष्ठ आहे. मनुष्याने जर समदृष्टी ठेवली तर द्वेषाचे मूळच नष्ट होते. मानवसमाजाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने समत्वदृष्टी असणे आवश्यक आहे.

आत्मौपम्य दृष्टि आणि प्राणिमात्रांची सेवा।

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति य:।।[7]

आणि

सर्वभूतस्थितं या मां मजलेकत्वमास्थित:।।[7]

वरील दोन्ही श्लोकात आत्मौपम्य दृष्टीचे महत्त्व सांगितले आहे. आत्मौपम्य दृष्टीचा अर्थ स्वत:च्या उपमेप्रमाणे सर्वांकडे पाहणे हा आहे. जसे मला सुख पाहिजे तसेच इतरांना पाहिजे, मला दु:ख नसावे तसेच इतरांनाही असू नये याचा विचार करणे म्हणजे आत्मौपम्य दृष्टी ठेवणे होय. मनुष्यमात्राची सर्व दु:खे, हानि, क्लेश व विपत्ति या सर्वांचे मूळच आत्मवद्भावाचा अभाव आहे. सर्वांकडे आत्मौपम्य दृष्टीने पाहू सर्व भूतांच्या (प्राणिमात्रांच्या) ठिकाणी राहणाऱ्या ईश्वराला एकभावाने स्थिर होऊन भजतो, तो खऱ्या ईश्वराची सेवा करतो. सर्वांना सहाय्य करणे हीच खरी ईश्वरसेवा होय. मनुष्यांची सेवा हीच ईश्वरसेवा असे सुचविणारा हा विचार सर्वांनीय अंगिकारण्याची गरज आहे.

**सत्कर्म करण्याचा परिणाम :-**

मनुष्य कधीकधी मोहाच्या प्रभावाने वाईट कर्म करण्यास प्रवृत्त होते आणि या दुष्कर्माचे त्याला अत्यंत वाईट परिणाम हे भोगावेच लागतात. आजच्या काळात अशा भ्रष्ट कर्मांची यादी फार मोठी होत असून मनुष्याने दुष्कर्म करु नये यासाठी त्याला दुष्कर्मांच्या परिणामांची जाणीव करवून



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

देऊन तसे करण्यापासून परवृत्त करण्याचे काम भगवद्गीता करते.

न ही कल्याणकृत्काश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ।[8]

शुभ कर्म करणाऱ्याची कधीही दुर्गती होत नाही. शुभ कर्म करणारा उन्नतच होतो. अशुभ कर्म करणारांचीच दुर्गति होते. त्याचप्रमाणे

नैवेह नामुत्र विनाशक्तस्य विधते ।[8]

शुभ कर्म करणाराचा इहलोकी आणि परलोकीही विनाश होणार नाही. दोन्ही लोकांत त्याचा अभ्युदयच होईल. दुष्कर्म करणाऱ्याचाच नाश होतो. हे विचार जर सुरुवातीचा काळातच म्हणजे संस्कारक्षम वयातच मनुष्यावर विंबवले तर समाजव्यवस्था दुष्कर्महीन होऊन मनुष्याचा खऱ्या अर्थाने अभ्युदयच होईल.

यांव्यतिरिक्त या अध्यायात विषयाच्या ओघात अशा अनेक गोष्टींना स्पर्श केला आहे. ज्या आजच्या काळाशी संवाद साधणाऱ्या आहेत. कर्तव्यतत्परता निर्भयता, सुद्धता, योग्य आचारविचार, सतत अभ्यास, एकाग्रता, इंद्रियानियमन, ज्ञानप्राप्ती, शांती इ. विषयांवरील ध्यानयोगाचे विवेचन हे मनुष्य जीवनाला मार्गदर्शन करणार आहे. म्हणूनच महत्मा गांधी म्हणतात -

'गीता हे एक मोठे धार्मिक काव्य आहे. याच्यात आपण जितके खोल शिरावे तितका नवा आणि सुंदर अर्थ आपणास प्राप्त होईल. गीता ही सर्वसाधारण लोकांना अत्यंत उपयुक्त अशी चीज आहे आणि म्हणूनच तिजमध्ये एकच गोष्ट अनेक प्रकारांनी पुन: पुन: सांगण्यात आलेली आहे. यासाठी गीतेत यौजिलेल्या महत्त्वाच्या शब्दांचे अर्थ निरनिराळ्या काळी बदलतील आणि त्यांच्या अर्थाचा दिवसानुदिवस विस्तार होत जाईल. परंतु गीतेचे मूळ तत्त्व मात्र कधीही बदलणार नाही.''[9]

महात्मा गांधींच्या या विवेचनाचा सार्थ प्रत्यय श्रीमद्भगवद्गीतेचा कालसंवादी विचार बघितल्यावर आल्याशिवाय राहत नाही.

**संदर्भ :-**

१) प्रस्तावना, महर्षी पं. श्रीपाद सातवळेकर
२) महाभारत, भीष्मपर्व (४३/२)
३) महाभारत भीष्मपर्व (४३/१)
४) पृष्ठ क्र.३११, श्रीमद्भगवद्गीता, जयदयाल गोयन्दका.
५) पृष्ठ क्र.२९१, श्लोक क्र.५, श्रीमद्भगवद्गीता, पं.श्री.दा.सातवळेकर.
६) पृष्ठ क्र.२९५, श्लोक क्र.९, श्रीमद्भगवद्गीता, पं.श्री.दा.सातवळेकर.
७) पृष्ठ क्र.३९४, श्लोक क्र.३१, ३२ श्रीमद्भगवद्गीता, पं.श्री.दा.सातवळेकर.
८) पृष्ठ क्र.३२१, श्लोक क्र.४० श्रीमद्भगवद्गीता, पं.श्री.दा.सातवळेकर.
९) प्रस्तावना, श्रीमद्भगवद्गीता, पं.श्री.दा.सातवळेकर.



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad